# प्रेसनोट

दि. ३१/०१/२०२४

दौंड तहसिल कार्यालय, जि. पुणे येथील महसुल सहायकावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | दौाड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. ७४/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४४ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | माधव राजाराम रेषेवाड, वय ५४ वर्ष, पद- महसुल सहायक, तडसिल कार्यालय, दौंड, जि. पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | १०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १०,०००/- रुपये (दहा हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | ०९/०१/२०२४, १०/०१/२०२४ |
| सापळा दिनांक | ३०/०१/२०२४ |

ठिकाण :- महेश गृहनिर्माण सोसायटीचे बाहेर रोडवर, गोपाळवाडी रोड, दौंड, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी सन २०१९ मध्ये ज्ञानदिप को. ऑप सोसायटी, दौंड यांचेकडून त्यांचे घर तारण ठेवून कर्ज घेतले होते. तक्रारदार याना सदर बँकेकडून थकीत कर्ज प्रकरणी घर जप्तीचे आदेश मा. तहसिलदार, दौड कार्यालयाचे मार्फतीने काढलेले आहेत. तक्रारदार यानी ज्ञानदिप सोसायटीमध्ये वन टाईम सेटलमेंट (OTS) करण्यासाठी ५ टक्के रक्कम भरली असुन तसे पत्र तहसिल कार्यालय, दौंड याना दिले होते. त्यानुसार तक्रारदार हे त्यांच्या घर जप्ती आदेशाची मुदत वाढविण्यासाठी दौंड तहसिल कार्यालयात गेले असता, तेथील लोकसेवक माधव रेषेवाड यानी तक्रारदार यांचेकडे जप्ती आदेशाची मुदत वाढवून देणेसाठी १०,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक माधव रेषेवाड यांनी तक्रारदार यांचेकडे घर जप्ती आदेशाची मुदत वाढवून देणेसाठी १०,०००/- रुपये लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन, लोकसेवक माधव रेषेवाड यानी तक्रारदार यांचेकडून रक्कम रुपये १०,०००/- (दहा हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.